B.Sc. Part—I (Semester—I) (CBCS) Examination
(Compulsory Language)
MARATHI

वेळ : 3 तास] [एकूण गुण : 40

सूचना :— सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

1. खालील सर्व वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न सोडवा :—

(1) मराठी भाषेतील आद्यचरित्रकाराचा मान कोणाला देण्यात येतो ?

(अ) म्हाइंभट (ब) एकनाथ

(क) राजळोबास (ड) यापैकी नाही

(2) 'गाडगेबाबांनी शाळा दिली' या पाठाच्या लेखिका कोण आहे ?

(अ) सीमा सारडे (ब) प्रतिमा इंगोळे

(क) साधना आमटे (ड) यापैकी नाही

(3) लेखक प्रकाश राठोड यांचा कोणता पाठ अभ्यासक्रमात आहे ?

(अ) रद्दी (ब) शिक्षण

(क) अन्वरशा फकीर (ड) आणि गहुली झाली माडली !

(4) लेखकर मधुकर वाकोडे यांचा जन्म आकोट तालुक्यातील कोणत्या गावी झाला ?

(अ) पळसोद (ब) अंजनगावसूर्जी

(क) येवदा (ड) केळापूर

(5) 'रद्दी' या कथेचे कथाकार कोण आहेत ?

(अ) मधुकर केचे (ब) जयंत नारळीकर

(क) विजय जाधव (ड) विलास अंभोरे

(6) मधुराभक्तीचे खरे सौंदर्य कोणत्या संताच्या विराण्यामध्ये प्रकटते ते लिहा ?

(अ) संत एकनाथ (ब) संत नामदेव

(क) संत ज्ञानेश्वर (ड) संत गोरा कुंभार

(7) कृष्णाजी केशव दामळे हे टोपणनाव कोणत्या कवीचे आहे ?

(अ) बी (ब) गोविंदाग्रज

(क) बाळकवी (ड) केशवसुत

(8) 'विश्वशांती' या कवितेतून कवी वैश्विक मानवतेचा कोणता संदेश देतात ?

(अ) शांतीचा (ब) युद्धाचा

(क) हिंसा (ड) यापैकी नाही

https://www.sgbauonline.com

(9) 'सुख' ही कविता कवी बदन सराडकर यांच्या कोणत्या काव्यसंग्रहातून घेतली आहे ?

(अ) कृष्णविवर (ब) पापणपालखी

(क) समुद्रपक्षी (ड) हंबर

(10) 'बाप' या कवितेचे कवी कोण आहे ?

(अ) राजेश महळे (ब) दिनेशकाळे

(क) विजय जाधव (ड) प्रमोद गारोडे $10\times1=10$

2. खालीलपैकी कोणताही एक दीर्घोत्तरी प्रश्न सोडवा :—

(अ) 'पाखाळा बाळक पांगुसणे' या पाठाद्वारे म्हाइंभट यांनी मांडलेला कयेचा आशय तुमच्या शब्दात लिहा.

(ब) 'नियतीच्या विक्राळ जबड्यात !' या पाठाच्या आधारे सिंधुताई सपकाळ यांचे जीवन रेखाटा.

(क) लेखक प्रकाश राठोड यांनी गहुळी तांड्याचे भीषण वास्तव कसे मांडले ते 'आणि गहुली झाली माडली !' यातून स्पष्ट करा.

(ड) 'अन्वरशा फकीर' या पाठातून लेखक मधुकर वाकोडे यांनी अन्वरशा फकीरचे स्वभावचित्र कसे रेखाटले. 5

3. खालीलपैकी कोणताही एक लघुत्तरी प्रश्न सोडवा :—

(अ) 'गाडगेबाबांनी शाळा दिली' या पाठातून सीमा साखेर यांनी गाडगेबाबां विषयी आलेले अनुभवाचे वर्णन कसे केले ते लिहा.

(ब) लेखकाने गहुली तांड्याचे वास्तवदर्शन कसे घडविले ते लिहा.

(क) सिंधुताई सपकाळ यांच्या जीवनातील चढ-उताराचे अनुभव कथन 'नियतीच्या विक्राळ जबड्यात!' या पाठाद्वारे करा.

(ड) अन्वरशा फकीराचे स्वभावचित्र लेखक मधुकर वाकोडे यांनी कसे रेखाटले आहे. 3

4. खालीलपैकी कोणताही एक प्रश्न दोन-तीन वाक्यात सोडवा :—

(अ) स्त्रीने गोसाव्याला कोणती विनंती केली होती.

(ब) कर्मयोगी गाडगेबाबांची भजनातून कशावर कोरडे ओढलेत ते लिहा.

(क) सीमा साखेर यांनी कशाचा धसका घेतला होता.

(ड) अन्वरशा फकीर कोणते मोहोळ झाडत नव्हता ते लिहा. 2

5. खालीलपैकी कोणताही एक दीर्घोत्तरी प्रश्न सोडवा :—

(अ) संत तुकाराम महाराज यांच्या 'टिळा टोपी उंच दावी' या अभंगाचे रसग्रहण करा.

(ब) केशवसुत यांनी 'विद्यार्थ्याप्रत' या कवितेतून केलेला उपदेश उलगडून दाखवा.

(क) कवी दिनेश काळे यांनी 'विश्वशांती' या कवितेतून शांतीचा, विश्वशांतीचा विचार कसा मांडला ते उदाहरणासह लिहा.

(ड) शेतकरी बापाचे दुःख 'बाप' या कवितेतून कवी प्रमोद गारोडे यांनी कसे व्यक्त केले. 5

https://www.sgbauonline.com

6. खालीलपैकी कोणताही एक लघुत्तरी प्रश्न सोडवा :—

(अ) संत ज्ञानेश्वरांची भाववस्था 'धनु वाजे घुणुघुणा' या विरहिणीतून प्रकटलेले आशयसौदर्य लिहा.

(ब) केशवसुत यांच्या 'विद्यार्थ्याप्रत' कवितेतील उपदेश आणि उपदेशामागचे वास्तव रेखाटा.

(क) कवी बबन सराडकर यांनी 'सुख' या कवितेतून नगण्याचे साधेपण कसे मांडलेले आहे.

(ड) कवी दिनेशकाळे यांनी 'विश्वशांती' वैश्विक मानवतेचा संदेश कसा दिला याविषयी कवितेचया ओळीतून उदाहरणासह स्पष्ट करा. 3

7. खालीलपैकी कोणताही एक प्रश्न दोन-तीन वाक्यात सोडवा :—

(अ) आपला दाह संपविण्यासाठी कोणते उपचार व्यर्थ आहेत असे 'घनु वाजे घुणुघुणा' यातून उळगडून दाखवा.

(ब) संत तुकाराम महाराज कोणापासून सावध रहा असे सांगतात ?

(क) कवी केशवसुत यांनी पृथ्वीवरील बहुमोल रत्ने 'विद्यार्थ्याप्रत' कवितेतून कोणती सांगितली ?

(ड) 'विश्वशांती' या कवितेतून कवी दिनेश काळे यांनी कोणता विचार मांडला ते लिहा. 2

8. खालीलपैकी कोणताही एक दीर्घोत्तरी प्रश्न सोडवा :—

(अ) कार्यालयीन कामकाजात मराठी भाषेला भरपूर वाव आहे याविषयी सविस्तर लिहा.

(ब) कोणत्या लेखनासाठी 'व्यावहारिक मराठी' उपयुक्त ठय शकते, ते उदाहरणासह स्पष्ट करा.

(क) 'भाषिक संवाद म्हणजे भाषेचा वापर होय' असे पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

(ड) व्यापक संदर्भ आणि हेतुमूळकता म्हणने काय ते स्पष्ट करा. 5

9. खालीलपैकी कोणताही एक लघुत्तरी प्रश्न सोडवा :—

(अ) हेतुमूलकता म्हणजे काय हे स्पष्ट करा.

(ब) मराठीची व्यवहारक्षेत्रे कोणती आहे ते स्पष्ट करा.

(क) भाषेळा व्यापक संदर्भ कसा असतो ते स्पष्ट करा.

(ड) पत्रलेखन विचार आणि भावना व्यक्त करण्याचा मार्ग आहे याविषयी भूमिका स्पष्ट करा. 3

10. खालीलपैकी कोणताही एक प्रश्न दोन-तीन वाक्यात सोडवा :—

(अ) कार्यालयीन कामकाजात भाषा कशी असावी ते स्पष्ट करा.

(ब) नियतकाळिकात कशा प्रकारचे लेखन गरजेचे असते ते लिहा.

(क) भाषेचा संवादव्यवहार कशाप्रकारे चाळतो ते लिहा. 2

https://www.sgbauonline.com